मराठी लोकसाहित्यातील प्राणीसृष्टीचा सांस्कृतिक अभ्यास

' A Cultural Study of Animals in Marathi Folk Literature'

SYNOPSIS / RESEARCH PROPOSAL

SUBMITTED TO THE

SHRI JAGDISH PRASAD JHABARMAL TIBREWALA UNIVERSITY

FOR THE DEGREE

OF

DOCTOR OF PHILISOPHY

IN

MARATHI

BY

SANTOSH KARBHARI THORAT

Reg. No.____________________

Under the Guidance of

DR. KESHAV PARBHAT TUPE

Associate Professor & HOD
Department of Marathi
Shri Asaramji Bhandwaldar Arts, Commerce & Science College,
Deogaon (R.), Tq. Kannad, Dist. Aurangabad. Pin-431 115.

2012 - 2013

प्रस्तावना (Inroduction)

लाखो वर्षांपासून उत्क्रांत होत होत माणूस आजच्या 'मानव' ह्या अवस्थेप्रत पोहचला. त्याचा एकपेशीय प्राण्यांपासून ते आजच्या मानव प्राण्यांपर्यंतचा उत्क्रांतीचा इतिहास हा वेगवेगळ्या अवस्थांतरातून सिद्ध झालेला दिसून येतो. 'माणूस हा सामाजिक प्राणी आहे.', 'माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे.' अशी विधान आज देखील मानवाच्या संदर्भात केली जातात. ही विधाने मानवाचे प्राणीसृष्टीशी असलेले अन्योन्य संबंध सूचित करतात.

उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांवर मानव स्वत:मध्ये विविध परिवर्तने घडवत गेला. टोळ्या, समूह करून राहू लागला. या सहजीवनासाठी त्याला समाजाची-संस्कृतीची आवश्यकता भासू लागली. त्या दृष्टीने मानवाची सामाजिक-बौद्धिक-मानसिक-धार्मिक गरज म्हणून संस्कृती उदयाला आली. संस्कृती ही मानवाची, त्या-त्या मानवी समूहाची स्वतंत्र निर्मिती म्हणता येईल. या संस्कृतीच्या निर्मितीत तत्कालीन अवस्था, भौगोलिक स्थिती, अवकाश, आर्थिक स्तर, पर्यावरण या बाबी जशा महत्त्वाच्या आहेत; तशीच संस्कृतीमध्ये समाविष्ट होणारी एक बाब म्हणजे त्या-त्या ठिकाणची प्राणीसृष्टी. मानव, संस्कृती आणि प्राणीसृष्टी यांचे अनोन्यसंबंध पुन्हा अधोरेखित होतात. हा संबंध तपासण्यासाठी सांस्कृतिक दस्तऐवज म्हणून आपणास लोकसाहित्याचा आधार घेता येतो.

मानवाने उभारलेल्या सांस्कृतिकविश्वात प्राण्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. मानवाची धर्मसंकल्पना, देवदैवते, सण-उत्सव, कृषी संस्कृती, रूढी-परंपरा या साऱ्यांचा कमी अधिक प्रमाणात प्राण्यांशी संबंध आहे. कुठल्याही धर्माचा आणि प्राण्यांचा संबंध हा बऱ्याच प्रमाणात दिसून येतो. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धर्मांच्या अनुषंगाने ही संकल्पना स्पष्ट करता येईल. या संदर्भात हिंदू धर्मचे उदाहरण उद्‌बोधक ठरेल. हिंदू धर्मातील दशावतार ही संकल्पना, गणपती, नरसिंह-हनुमान आदी देवतांचे अर्धनर-अर्ध प्राणी स्वरूप, गाईच्या पोटात तेहतीस कोटी देव ही संकल्पना, कुत्रा-कासव, नंदी यांचे मानवी मनातील स्थान, मंदिरात देवाच्या अगोदर प्राण्यांची पूजा वगैरे बाबी भारतीय संस्कृतीतील प्राण्यांचे स्थान अधोरेखित करतात. अन्य धर्मांच्या अनुषंगाने देखील काहीसा असाच प्रकार नमूद करता येईल.

विविध धर्मांचे ग्रंथ, तसेच मानवाने निर्मिलेले कलाविश्व, चित्र, शिल्प, नाट्य, नृत्य आदी यातही प्राण्यांचा वावर दिसून येतो. याचाच अर्थ मानवाच्या समूहनेणीवेत (Collective

unconcious) प्राणी विश्वाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मग हे प्राणी लोकजीवनात कधी दैवते, कुलदैवते, देवक वा सण-समारंभ यासाठी प्राधान्याने दिसून येतात. लोकसाहित्यातही या प्राण्यांचा वावर सातत्याने दिसून येतो.

लोकसाहित्य ही समूहमनाची सांस्कृतिक अभिव्यक्ती असते. या समूह मनामध्ये दडलेल्या प्राणी जीवनाचा वेध घेणे, प्रस्तुत अभ्यासात योजिले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research Study)

१) मराठी लोकसाहित्यातील प्राणीसृष्टीचा सांस्कृतिक अंगांनी वेध घेणे.

२) लोकजीवनातील प्राण्यांचे स्थान अधोरेखित करणे.

३) सण-समारंभ, उत्सव, विविध धर्मस्थळे, तीर्थक्षेत्रे, शिल्पे यांतील प्राणी जीवनाचा सांस्कृतिक अंगाने अन्वयार्थ लावणे.

४) लोकसाहित्यातील प्राण्यांसंदर्भातील मिथ्यकथा, आदिबंध यांचा वेध घेणे.

५) लोकजीवनातील प्राण्यांच्या संदर्भातील म्हणी, वाक्प्रचार यांचे संकलन करणे.

६) लोकजीवन आणि प्राणीजीवन यांची अन्योन्यता तपासणे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधन सिद्धतेसाठी विविध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतला जाईल. लोकजीवनातील प्रत्यक्ष माहितीचा सर्वेक्षण, मुलाखती यांच्या आधारे वापर केला जाईल. माहिती संकलनानंतर तिच्या विश्लेषणासाठी विविध अभ्यासपद्धतींचा आधार घेतला जाईल. संस्कृती अभ्यास पद्धती (Culture Study) मानसशास्त्रीय विश्लेषण पद्धती (Psyco-analytic Study), मानववंशशास्त्रातील काही अभ्यासपद्धतींचा प्रस्तुत संशोधनासाठी वापर केला जाईल. विश्लेषण, अन्वेषण पद्धतींचाही वापर केला जाईल.

सर्वेक्षण :

लोकसाहित्यातील विविध कला-वाङ्मयप्रकारांचा अभ्यास करत असतांना प्रत्यक्ष सर्वेक्षण, संकलन पद्धतीचा वापर केला जाईल. महाराष्ट्रातील व बृहन्महाराष्ट्रातील विविध भागातील सांस्कृतिक, भौगोलिक भिन्नत्व आणि साहित्यसृष्टीतील त्याचे दर्शन यांचे प्राण्यांच्या अनुषंगाने

प्रत्यक्ष सर्वेक्षण केले जाईल. लेण्या, विहारे, मंदिरे यांसारख्या ठिकाणच्या प्राणीसृष्टीचे प्रत्यक्ष निरीक्षण करून त्यांचा अन्वयार्थ लावला जाईल.

मुलाखत :

प्राण्यासंदर्भात त्या-त्या भौगोलिक परिसरातील स्थानिक लोकांच्या मुलाखती घेण्यात येतील. प्राणीविषयक साहित्य-लेखन करणाऱ्या लेखकांच्या मुलाखती घेतल्या जातील.

विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे यांचा आधार घेतला जाईल. शिवाय दृक-श्राव्य साधनांचा वापर करून ध्वनीचित्र मुद्रणही केले जाईल.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis)

१) लोकजीवनात प्राणीसृष्टीचे स्थान अन्योन्य असल्याचे लक्षात येते.

२) लोकसाहित्य प्राणीसृष्टीचे सांस्कृतिक संदर्भ विपुल प्रमाणात आहेत.

३) धर्मग्रंथ, दैवते, तीर्थक्षेत्रे यांचा आणि प्राणीसृष्टीचा महत्त्वपूर्ण संबंध आहे.

४) लोकसाहित्यात नागप्रतिमा विविध अर्थांनी अभिव्यक्त झाली आहे.

५) लोकजीवनात प्राण्यांसंदर्भातील म्हणी, वाक्प्रचार यांचे प्रमाण अधिक आहे.

हा संशोधन अभ्यास शिस्तशीर व्हावा म्हणून त्याची प्रकरणनिहाय मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : संस्कृती अभ्यास : स्वरूप व पद्धती

प्रस्तुत प्रकरणात संस्कृती अभ्यासाची पद्धती समजावून घेण्यात येईल. संस्कृतीची व्याख्या, स्वरूप, लोकसंस्कृती, कृषीसंस्कृती, सांस्कृतिक गतिकी, संस्कृतीवर परिणाम करणारे घटक, स्थिर संस्कृतीची वैशिष्ट्ये अशा विविध बाबींचा परामर्श घेण्यात येईल. संस्कृती अभ्यास या पद्धतीची घटकनिहाय मांडणी समजावून घेऊन तिची लोकसंस्कृतीच्या संदर्भात उपयुक्तता तपासण्यात येईल.

प्रकरण दुसरे : लोकसाहित्यातील प्राणीसृष्टीविषयक मिथ्यकथा, दैवतकथा

लोकसाहित्य प्राणीसृष्टीने व्यापून राहिलेले आहे. लोकजीवनात अनेक दैवतकथा,

मिथ्यकथा प्रचलित आहेत. त्यातील कित्येक कथांमध्ये प्राणीसृष्टीचा वैपुल्याने वावर दिसून येतो. अशा मिथ्यकथांचा, दैवकथांचा शोध प्रस्तुत प्रकरणातून घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : लोकसाहित्यातील नाग प्रतिमा

लोकजीवनात नागाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. केवळ भितीपोटीच नव्हे; तर आदरयुक्ततेने देखील नागांचा उल्लेख होतो. नागपंचमी, नाग, नागकन्या, सर्पसत्र, अशा विविध संकल्पना लोकजीवनात रूढ आहेत. त्या लोकसाहित्यातून कमी अधिक प्रमाणात अभिव्यक्त झाल्या आहेत. या विविध नागप्रतिमांचा वेध प्रस्तुत प्रकरणातून घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : लोकसाहित्यातील 'गाय' व 'बैल' विषयक प्रतिमासृष्टी

गाय व बैल हे उपयुक्त पशु लोकजीवनात महत्त्वपूर्ण स्थान मिळवून आहेत. त्यांच्या आत्यंतिक उपयुक्ततेमुळे ते दैवत स्थानी देखील आहेत. अशा या प्राण्यांना साहित्यातदेखील महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांच्या संदर्भातील विविध प्रतिमासृष्टींचा वेध प्रस्तुत प्रकरणातून घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : लोकसाहित्यातील प्राणी-पक्षीविषयक संकेत आणि म्हणी व वाक्प्रचार

लोकजीवनात प्राणी-पक्षीविषयक विविध संकेत रूढ आहेत. विविध चांगल्या व वाईट, इष्टानिष्ट कर्माची फलश्रुती ही प्राण्यांच्या दिसण्यावरून ठरवली जाते. मांजर आडवी जाणे, पालीचे चित्कारणे, कुत्र्याचे विव्हळणे, टिटवीचे ओरडणे, नागाचे, कावळ्याचे जुळे पाहणे वगैरे बाबींचे संकेत अनिष्ट समजले जातात, तर मुंगसाचे तोंड पाहणे इष्ट, शुभ समजले जाते. असे विविध प्राणी-पक्षी विषयक संकेत लोकजीवनात रूढ आहेत; त्याशिवाय कित्येक म्हणी, वाक्प्रचार समाजजीवनात लोकजीवनात रूढ आहेत. ते संकलित करून एकत्रित स्वरूपात त्यांची यादी करण्यात येईल. त्या म्हणी-वाक्प्रचारांचा अन्वयार्थ देखील जाणून घेण्यचा प्रयत्न करता येईल.

प्रकरण सहावे : समारोप व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात मागील सहा प्रकरणातून जी सविस्तर चर्चा केली त्यातून जे निष्कर्ष हाताशी आले ते एकत्रित स्वरूपात मांडण्यात येईल. 'मराठी लोकसाहित्यातील प्राणीसृष्टीचा सांस्कृतिक अभ्यास' या शीर्षकाअंतर्गत जे संशोधन झाले, त्यातून जी फलश्रुती हाताशी आली त्या संदर्भात एकत्रित चर्चा करण्यात येईल. त्याशिवाय जी गृहीतके समोर ठेवून संशोधन केले होते. त्या गृहितकांचा पडताळा देखील प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात येईल आणि लोकजीवनात पर्यायाने लोकसाहित्यात प्राणीसृष्टीचा वावर कशाप्रकारे व कितपत आहे; त्यासंदर्भात काही ठोस निष्कर्षात्मक विधान करण्यात येईल.

संशोधन प्रबंधाच्या शेवटी काही परिशिष्टे जोडण्यात येतील.

परिशिष्टे :

अ) संदर्भग्रंथ सूची

ब) मुलाखती -

१) स्थानिक परिसरातील व्यक्ती (निवडक)

२) मराठी अभ्यासक, संशोधक, लेखक (निवडक)

क) प्राण्यासंदर्भातील म्हणी-वाक्प्रचार यांची यादी.

मार्गदर्शक
डॉ. केशव परभतराव तुपे
प्रपाठक व मराठी विभागप्रमुख
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव (रं.),ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

संशोधक
संतोष कारभारी थोरात

❖❖❖❖

- **Title of Research Work** : **'A Cultural Study of Animals in Marathi Folk Literature'**
  मराठी लोकसाहित्यातील प्राणीसृष्टीचा सांस्कृतिक अभ्यास

- **Name of Scholar** : **Santosh Karbhari Thorat**

- **Subject** : **Marathi**

- **Registration No.** : ____________________

- **Name of Guide** : **Dr. Keshav Parbhat Tupe**

- **Designation** : **Associate Professor**

- **Guide Working Place** : **Shri Asaramji Bhandwaldar Arts, Commerce & Science College, Deogaon (R.), Tq. Kannad, Dist. Aurangabad (M.S.), Pin-431 115.**

❖❖❖❖